CMYK



आजचा रंग : निळा

निळा रंग म्हणजे निष्ठा आणि आत्मविश्वास

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. १८ ऑक्टोबर २०२३ | ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २० वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## अश्लिल वर्तन करत अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**सोलापूर** : अल्पवयीन मुलगी घरात एकटी असताना तिच्याशी झटापट करून तरुणाने तिचा विनयभंग केला. हा प्रकार सोमवारी दुपारी शहरातल्या एका भागात घडला. याप्रकरणी शहरातील पोलीस ठाण्यात एका तरुणाविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला आहे. यातील पीडितेची आई कामाला जाते. घटनेदिवशी पीडितेची आई बाहेर गेल्यानंतर दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास आरोपी घरात शिरला. त्याने आईने बोलावले आहे असे म्हणत आरोपी पीडितेशी अश्लिल वर्तन करत होता. त्यावेळी आई आल्याने तिने आरोपीला ढकलून दिले. त्यामुळे चिडलेल्या आरोपीने पीडितेच्या आईला धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

# बस्स झाले...आता शेवटचा चान्स

**सुराज्य/मुंबई**

**शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमधील आमदारांच्या अपात्रता प्रकरणावर विधानसभा अध्यक्षांकडून चालढकल केली जात असल्याच्या विरोधातील याचिकांवर सुनावणी मंगळवारी पार पडली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा विधानसभा अध्यक्षांना कठोर शब्दात फटकारले आहे. बस्स झाले आता तुम्हाला शेवटचा चान्स देतोय. दसऱ्याच्या सुट्टीत तुम्ही बसा आणि ३० तारखेला परत आमच्याकडे या. जर ते वेळापत्रक आम्हाला मान्य असेल तर ठीक आहे नाहीतर आम्ही आमचे वेळापत्रक देऊ असे म्हणत सर्वोच्च न्यायालयाचे विधानसभा अध्यक्षांवर ताशेरे ओढले आहेत.**

सुनावणी लवकरात लवकर करून निर्णय देण्यासाठी न्यायालयाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांना सुधारित वेळापत्रक सादर करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, मंगळवारी नार्वेकरांकडून सुधारित वेळापत्रक सादर करण्यात आले नाही. त्यामुळे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी विधानसभा अध्यक्षांच्या कृतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. आम्ही ११ मे रोजी निकाल दिला. त्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी काहीच केले नाही. आता ही शेवटची संधी असेल, असे त्यांनी म्हटले आहे.

तुम्ही सादर केलेल्या वेळापत्रकावर आम्ही समाधानी नाही. सॉलिसिटर जनरल तुषार मेहतांनी आम्हाला आश्वस्त केले की दसऱ्याच्या सुट्टीदरम्यान ते स्वत: विधानसभा अध्यक्षांसमवेत बसून वेळापत्रक तयार करतील. यासाठी ही अंतिम संधी आम्ही देत आहोत. या प्रकरणाची पुढची सुनावणी ३० ऑक्टोबर रोजी होईल, असे आदेश दिले.

## ▸ सर्वोच्च न्यायालयाचे विधानसभा अध्यक्षांवर ताशेरे
## ▸ पुढील सुनावणी ३० ऑक्टोबरला होणार

### छोटे मोठे निर्णय सांगू नका : न्या. चंद्रचूड

दैनंदिन काम करताय तर त्यानुसार निर्णय घ्यावा लागेल. जर तुम्ही ठोस निर्णय घेत नसाल तर आम्हाला निर्णय घ्यावा लागेल. याचिका निवडणूक आयोगासमोर नाही तर अध्याक्षांसमोर आहे. आतापर्यंत झालेले छोटे मोठे निर्णय सांगू नका, असे न्या. चंद्रचुड यांनी खडसावले.

### तुषार मेहता यांच्याकडून बचावाचा पूर्ण प्रयत्न

विधानसभा अध्यक्षांचे वकिल तुषार मेहता यांनी बचावाचा पूर्ण प्रयत्न केला आहे. तुषार मेहता म्हणाले, एकट्या शिवसेनेच्या ३४ याचिका आल्या आहेत. त्यामुळे अध्यक्षांना वेळ लागत आहे. आज वेळापत्रक देण अव्यवहार्य आहे. तुम्हाला दैनंदिन वेळापत्रकची माहिती नव्हती हे आम्हाला माहित नव्हते . अनेक याचिका दाखल झाल्यामुळे सर्व याचिकांचा आढावा घ्यावा लागणार आहे.



### नार्वेकर चोरांचे सरदार म्हणून काम करत आहेत : राऊत

नार्वेकर चोरांचे सरदार म्हणून काम करत आहेत, अशी टीका खा.संजय राऊत यांनी विधानसभा अध्यक्षांवर केली आहे. विधानसभा अध्यक्षांचे अशा पद्धतीने वागणे हे बेकायदेशीर आणि संविधान विरोधी आहे. हे चोर आणि लफंग्यांचे सरकार ते चालवत आहेत. त्या चोर आणि लफंग्यांना घटनात्मक पदावर बसलेली व्यक्ती जर संरक्षण देत असेल तर या देशामध्ये आणि राज्यामध्ये काय चालले आहे, याची कल्पना न केलेली बरी. असा टोला राऊतांनी लगावला आहे.

### अनिल परबांची बोचरी टीका

विधानसभा अध्यक्ष ज्यापद्धतीने बाहेर वक्तव्य करत आहेत. ही वक्तव्य एकंदर पाहता असं दिसतं की, सर्वोच्च न्यायालयाचे आदेश त्यांना लागू नाहीत, अशा भ्रमात ते आहेत. निर्णय घेण्यासाठी जास्त वेळ लागण्याची काही गरज नाही, अशी बोचरी टीका परबांनी केली.



## पुन्हा उलटफेर!

**▸ विश्वचषकात नेदरलँडचा अफ्रिकेला दणका**

**धर्मशाळा :** मंगळवारच्या यंदाच्या विश्वचषकात सामन्यात पुन्हा उलटफेर झाला आहे. नवख्या नेदरलँड संघाने बलाढ्या अशा दक्षिण अफ्रिका संघावर ३८ धावांनी विजय मिळवला. दोन दिवसांपूर्वी झालेल्या सामन्यात अफगाणिस्तानने इंग्लंडचा पराभव करत उलटफेर केला होता. पावसामुळे हा सामना सुमारे दीडतास उशीरा सुरु झाला. त्यामुळे हा सामना ४३ षटकांचा करण्यात आला. नेदरलँड संघाने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद २४५ धावा केल्या. ५ आऊट ८२ धावा अशा बिकट परिस्थितीतून एडवर्डच्या नाबाद ७८ धावांच्या जोरावर २४५ धावसंख्या गाठली. विजयासाठी २४६ धावांचा पाठलाग करताना अफ्रिकेची सुरुवात खराब झाली. गेल्या दोन सामान्या शतकवीर असलेल्या डिकॉक केवळ २० धावाच करता आल्या. मिलरने ४३ धावा केल्या. उर्वरित अफ्रिकेच्या फलंदाजांना मोठी धावसंख्या उभा करता आली नाही. त्यामुळे संघ २०७ धावांवर बाद झाला. नेदरलँडकडून लोगन अ‍ॅक बिक, पॉल मिक्रेन आणि रोलेफ मेरवे यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. यापूर्वीही २०२२ च्या टी-२० विश्वचषकात नेदरलँडने अफ्रिकेला १३ धावांनी पराभूत केले होते.

## उसतोड मुकादमाने केली ऊस वाहतूकदाराची ५ लाखांची फसवणूक

**सुराज्य/कुर्डूवाडी**

ऊसतोड मजूर पुरवतो म्हणून मुकादमाने ऊस वाहतूकदाराची सुमारे ५ लाखांची फसवणूक केली आहे. ऊस वाहतूकदार संतोष बबन भोंग (लऊळ ता.माढा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मुकादम पिंट्या मिठ्ठ्या पावरा (वय-२३ रा. नागझिरा, ता.शहादा, जि.नंदुरबार) याच्यावर कुर्डूवाडी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.



संतोष भोंग यांनी सन २०२२-२३ च्या गळीत हंगामासाठी कारखान्याबरोबर ऊस वाहतुकीचा ४ लाख ५० हजार रुपयांचा करार केला. त्यापैकी काही रक्कम फोनपे अकाऊंटवरुन हिरालाल भीमसिंग गिरसे, गणेश गवळ ठाकरे, प्रताप लोटन पावरा, प्रकाश सुरेश धंगर, तोकल अकील तेली, रोहिदास आट्या पावरा, नितीन रवींद्र पुरनाइक, कैलास बारकू कोळी यांच्या फोन पे अकाऊंटवर एकूण ३ लाख ५० हजार रुपये पाठवले. नोटरी करुन १ लाख रुपये समक्ष रोख स्वरूपात मुकादम पावराला दिले.

त्यानंतर आणखी दोन मजूर वाढवून देतो, म्हंटल्यावर फिर्यादीने आणखी पैसे दिले. त्यानंतरही मुकादमाने मजुरी दिली नाही आणि दमदाटी केली.

## शहरात दोन ठिकाणी अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**सुराज्य/सोलापूर**

शहरात विविध दोन ठिकाणी अल्पवयीन मुलीवर अत्याचार करण्याची घटना घडली आहे. दोन्ही प्रकरणात पोक्सो अंतर्गत तरुणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पहिल्या घटनेत एका सतरा वर्षीय अल्पवयीन मुलीचे फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन तिच्यावर वारंवार दुष्कर्म केल्याची घटना घडली आहे. सतरा वर्षाच्या पीडितेने दिलेल्या फिर्यादीवरून तरुणाविरुद्ध शहर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत



आरोपीने पीडित मुलीचा मैत्री करण्यासाठी पाठलाग केला. त्यानंतर त्याने तिला गप्पा मारण्याच्या बहाण्याने हैदराबाद रस्त्यावरील एका हॉटेलमध्ये नेले. त्या ठिकाणी त्याने तिच्यावर जबरदस्तीने दुष्कर्म केले. त्यावेळी त्याने त्याच्या मोबाईलमध्ये तिचे नकळत फोटो काढून ते व्हायरल करण्याची धमकी देत तिच्यावर तीन ते चार वेळा दुष्कर्म केले. तिला तिच्या घरा मागच्या जंगलात नेऊन तिचा विनयभंग केली असल्याची फिर्याद पीडित मुलीने दिली आहे.

दुसऱ्या घटनेत एका अल्पवयीन मुलीच्या घरात घुसून भरदिवसा तरुणाने तिच्यावर दुष्कर्म केल्याची घटना घडली आहे. दुपारी बाराच्या सुमारास पीडित मुलगी आपल्या घरात एकटी असताना आरोपीने तिच्या घरात घुसून तिच्यावर दुष्कर्म केले आहे. ही बाब उघडकीस आल्यानंतर पीडित मुलीच्या बहिणीने शहर पोलिसात त्या तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आली आहे.

## सोलापूरचा खासदार काँग्रेसचाच : शिंदे

**पंढरपूर** : आमदार प्रणिती शिंदे यांनी मंगळवारी पंढरपूर येथे काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत सोलापूर लोकसभेच्या पार्श्वभूमीवर मोठं विधान केले आहे. शिंदे म्हणाल्या, लोकसभेच्या २०२४ च्या निवडणुकीत काही झाले तरी सोलापूरचा खासदार हा काँग्रेसचाच असेल आणि पंढरपूरचा आमदारही लोकशाही आघाडीचा असणार असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

तसेच त्यांनी आगामी निवडणुकीत पक्ष देईल ती जबाबदारी पार पडणार असल्याचे सांगत लोकसभेच्या उमेदवारीचेही संकेतही दिले. शिंदे म्हणाल्या, राज्यातील खोके सरकारला जनतेच्या प्रश्नांचे काही पडले नसून जनता निराश झाली आहे, असे शिंदे म्हणाल्या.



## लंपीच्या बचावासाठी आता जनावरांसाठी पीपीई कीट

**सुराज्य/सोलापूर**

राज्यातील गेल्या अनेक दिवसांपासून लंपी रोगाने थैमान घातले आहे. यामुळे पशू पालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

मात्र आता सांगोला तालुक्यातील एका शेतकऱ्याने यावर उपाय म्हणून पीपीई कीट तयार केले आहे. लंपी रोगामुळे राज्यभरातील जनावरांची अनेक आठवडे बाजार देखील बंद ठेवण्यात येत आहेत. मात्र, या संसर्गजन्य आजारावर महुद (ता. सांगोला) येथील एका शेतकऱ्याने शक्कल लढवत उपाय काढला आहे. महूदचे शेतकरी जितेंद्र बाजारे यांनी हा पीपीई कीट तयार केले आहे. या पीपीई किटमुळे पशुपालकांची चिंता ही काही अंशी कमी होणार आहे.

## सेनेच्या शिंदे गटात मारहाण; तिघेजण जखमी

**सुराज्य/सोलापूर**

रेल्वे लाईन परिसरातील सातरस्ता येथे शिवसेनेच्या शिंदे गटात तीक्ष्ण शस्त्र लोखंडी सळई आणि लाथाबुक्क्याने झालेल्या मारहाणीत तिघेजण जखमी झाले. ही घटना शनिवारी रात्री १२ वाजेच्या सुमारात घडली.

जिल्हाप्रमुख आणि युवासेना प्रमुख यांच्यात ही हाणामारी झाली. भगवान प्रकाश कदम (वय ४२ रा.उत्तर कसबा) असे पहिल्या गटातील जखमीचे नाव आहे. सातरस्ता परिसरात त्याला बाळकृष्ण साठे, प्रियदर्शन साठे, सुदर्शन साठे आणि इतर दोन जणांनी मिळून मारहाण केली.

तर दुसऱ्या गटात सुदर्शन बाळासाहेब साठे (वय ४०) आणि त्याचा भाऊ प्रियदर्शन साठे (वय ३७ दोघे रा. तीर्थरूप अपार्टमेंट, रेल्वे लाईन) यांना घरासमोर अज्ञात कारणावरून अमोल शिंदे आणि त्याच्या १० ते १५ साथीदारांनी मिळून लोखंडी सळई, काठी आणि लाथाबुक्क्याने मारहाण केली. अशा नोंदी सदर बाजार पोलिसात झाल्या आहेत.

या दोन गटात कोणत्या कारणामुळे मारहाण झाली याचे कारण अद्याप समजू शकले नाही. एकनाथ शिंदे यांचा दौरा या महिन्यात सोलापुरात आहे. त्या पार्श्वभूमीवरच शिंदे गटात हाणमारी झाल्याने वाद चव्हाट्यावर आला आहे.

## चिखलठाण येथे विवाहित इसमाची विष पिऊन आत्महत्या

**सुराज्य/सोलापूर**

चिकलठाण (ता.करमाळा) येथे राहणाऱ्या एका ४५ वर्षीय विवाहित इसमाने विष पिऊन आत्महत्या केली. काल सोमवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास त्याने राहत्या घरात विष प्राशन केले होते. त्याला करमाळा येथे प्राथमिक उपचार करून गौरव (मुलगा) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारा दरम्यान तो आज मंगळवारी दुपारी मयत झाला. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली. आत्महत्या मागचे कारण समजले नाही.

## भाजी आणण्यासाठी गेलेल्या व्यक्तीचा मृतदेह आढळला

**सुराज्य/मोहोळ**

बाजारात भाजी आणण्यासाठी गेलेल्या ४५ वर्षे व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना १६ ऑक्टोबर रोजी मोहोळ तालुक्यातील पेनूर येथे उघडकीस आली. मोहोळ पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. हणमंत बारीकराव पवार असे मृताचे नाव आहे.

हणमंत पवार हे १४ ऑक्टोबर रोजी दुपारी दोन वाजण्याच्या दरम्यान गावात बाजार आणण्यासाठी भावासोबत गेले होते. त्यादरम्यान बाजारातून इतर भाजीपाला घेऊन येतो म्हणून हणमंत पवार हे भावापासून वेगळे झाले.

त्यानंतर त्यांचा भाऊ वाट पाहून घरी आला. काहीवेळाने हणमंत यांच्याबाबत चौकशी केली असता ते घरी आले नसल्याचे समजले.त्यानंतर गावात व नातेवाईकांकडे सर्वत्र शोधा शोध केली मात्र ते मिळून आले नाहीत. दरम्यान १६ ऑक्टोबर रोजी सकाळी आठ वाजता दरम्यान हणमंत पवार हे पेनूर येथीलच गुजरबी कादर मुजावर यांच्या शेतात बांधालगत सडलेल्या अवस्थेत आढळून आले. त्यानुसार शांताबाई दत्तात्रय पवार यांनी मोहोळ पोलीस ठाण्यात खबर दिली आहे. तपास सहाय्यक पोलीस फौजदार लोबो चव्हाण करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



मी नाटक नाही करत आहे !

कल्याण
667-90-145

मुंबई
390-24-590

# उजनीतून कालव्यात सोडले पाणी

**▸ करकंब येथील टँक, आष्टी तलाव भरून घेणार**
**▸ १ नोव्हेंबरपासून कालवा व बोगद्यातून शेतीसाठी पाणी**

**सुराज्य/टेंभुर्णी**

उजनी धरणाच्या मुख्य कालव्यातून मंगळवार, दि. १७ ऑक्टोबर सकाळपासून १ हजार ५०० क्युसेक्स विसर्गाने पाणी सोडण्यात आले आहे. या पाण्यातून करकंब येथील पाण्याचा टँक व आष्टी तलाव भरून घेण्यात येणार आहे. दि. १ नोव्हेंबरपासून मुख्य कालवा, उजवा, डावा कालवा, भीमा-सीना जोड कालवा (बोगदा) यामधून शेतीसाठी पाण्याचे आवर्तन सुरू करण्यात येणार असल्याचा निर्णय काल झालेल्या आढावा बैठकीत घेण्यात आला. अशी माहिती जलसंपदा विभाग सोलापूरचे अधीक्षक अभियंता धीरजसाळे यांनी दिली.

दि. १५ ऑक्टोबर हा सरकारी पावसाळा संपलेला अखेरचा दिवस असतो. २०२३ या पावसाळ्यात सर्वत्र पाऊस कमी झाला. त्याचप्रमाणे उजनी धरणाच्या वरील भागातदेखील कमी-जास्त प्रमाणात पाऊस झाल्यामुळे उजनीची वरील १९ धरणे १०० टक्के भरली असली तरी उजनी धरण जलाशयामध्ये आज ६०.५६% पाणी व ९६ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. करकंब परिसर, आष्टी, आठ गावे, अनेक



वाड्यावर पिण्यासाठी पाण्याचे प्रचंड हाल सुरू आहेत. पाण्याच्या टँकरची मागणी होत आहे. कालव्यातून पाणी सोडण्याची मागणी अनेक दिवसांपासून होत आहे. यासाठी मंगळवार, दि. १७ ऑक्टोबर सकाळपासून पिण्यासाठी करकंब, आष्टी तलाव भरून घेण्यासाठी १५०० क्युसेक्सने मुख्य कालव्यातून पाणी सोडण्यात येणार असल्याचे अधीक्षक अभियंत्यांनी सांगितले.

### येत्या १ नोव्हेंबरपासून शेतीसाठी आवर्तन सोडणार

दि. १ नोव्हेंबर २०२३ पासून शेतीसाठी मुख्य, उजवा, डावा कालवा, भीमा-सीना जोड कालवा (बोगदा) यातून पाणी सोडण्यात येणार असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

### उजनी जलाशयाची स्थिती

- पाणी पातळी : ४९४.८८५ दशलक्ष घनमीटर
- एकूण साठा: २७१८.८४ दशलक्ष
- घनमीटर (९६.९० टीएमसी)
- उपयुक्त साठा: ९१६.०३ दशलक्ष
- घनमीटर (३२.३५ टीएमसी)
- टक्केवारी : ६०.३८%
- धरणात येणारा विसर्ग बंद
- धरणातून विसर्ग सीना-माढा सिंचन योजना ३३३ क्युसेक्स
- दहिगाव सिंचन योजना १२०
- मुख्य कालवा..१५०० क्युसेक

CMYK